Dhanlaxmi Shikshan Sanstha's

**SSK COLLEGE OF PHARMACY**

SSK Campus, Wadzire, Tal: Sinnar, Dist: Nashik, Maharashtra 422102
(Approved by PCI, New Delhi, DTE Maharashtra, Affiliated by MSBTE)
PCI Code: 5808 DTE Code: 5502 MSBTE Code: 62355
Email: sskdpharmacy@gmail.com Website: www. sskdpharmacy.com

# मराठी भाषा संवर्धन कार्यक्रमाचा अहवाल

**या तंत्रज्ञानाच्या युगात संपूर्ण महाराष्ट्रात मराठी भाषेचे वैभव जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.** एस एस के कॉलेज ऑफ फार्मसी,वडझिरे,२०२३-२०२४ अंतर्गत विद्यार्थ्यांची मराठी शब्दसंपदा वाढविण्यासाठी आणि त्यांना मराठी संस्कृती आणि इतिहासाची ओळख करून देण्यासाठी विविध स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. १८ जानेवारी २०२४ रोजी करिअर एस एस के कॉलेज ऑफ फार्मसी टीमने विद्यार्थ्यांना संगणकीय ग्रंथालयाचे संकेतस्थळ उपलब्ध करुन दिले.

## ***कार्यक्रमाची संकल्पना***

महाराष्ट्रातील गौरवशाली भाषा जपण्यासाठी आणि संपूर्ण महाराष्ट्रात मराठी भाषेच्या संवर्धनासाठी दरवर्षी १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा केला जातो.

विद्यार्थ्यांची शब्दसंग्रह वाढविण्यासाठी आणि त्यांना मराठी संस्कृती आणि इतिहासाची ओळख करुन देण्यासाठी एस एस के कॉलेज ऑफ फार्मसी ने या पंधरवड्यातील कार्यक्रम साजरा केला आहे. यावेळी, फार्मसी विभागाने विविध स्पर्धा आयोजित केल्या. केवळ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाच नव्हे तर अध्यापन आणि शिक्षक नसलेल्या कर्मचाऱ्यांनीही "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्यासाठी या स्पर्धांमध्ये उत्साहाने भाग घेतला.


**"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** तारखेचे व उपक्रमांचे वेळापत्रक खालीलप्रमाणे :- वेळः दुपारी ११:०० वाजता

| **तारीख** | **उपक्रम** |
|---|---|
| २१/०१/२०२४ | कथा लेखन, निबंध लेखन व कथाकथन |
| २२/०१/२०२४ | काव्यवाचन, काव्यलेखन, चारोळी लेखन, |
| २३/०१/२०२४ | व्याख्यान (प्रेरणादायक मार्गदर्शन) |
| २४/०१/२२०२४ | प्रश्न मंजुषा |

## २१ जानेवारी २०२४

२१ जानेवारी २०२४ रोजी दुपारी ११ वाजता "**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा**" ह्या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्यप्रो सुशिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. प्राचार्य डॉ.सुशिल पाटील यांच्या औपचारिक स्वागत परिचयाने कार्यक्रमाची सुरुवात झाली व त्यांनी कार्यक्रमाची रुपरेषा आणि विविध स्पर्धांचे उद्दिष्ट सांगितले. प्रो.तेजल खालकर यांनी श्रोत्यांना संबोधित करून मराठी भाषेचा इतिहास व महत्त्व विशद केले. प्रो. पंकज गुंजाळ यांनी **कथा लेखन, निबंध लेखन व कथाकथन** चे सुत्रसंचालन केले. विविध विभागातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी केला.

कुमार.अंकुश चंदगीर ह्या विद्यार्थ्याने कथा लेखन स्पर्धेनध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला केला. प्रो.तेजल खालकर यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.






## २२ जानेवारी २०२४

२२ जानेवारी २०२४ **काव्य वाचन, काव्य लेखन, चारोळी लेखन** या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले, विविध कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला, प्रा. सुशिल पाटील,प्रो. पंकज गुंजाळ, यांनीही कविता सादर केल्या.फार्मसी च्या सर्व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेतला. मराठी कविता म्हणजे काय हे काव्यवाचन स्पर्धेतन विद्यार्थ्यांना समजले.





कुमारी.दिव्या कांगणे ह्या विद्यार्थिनीने काव्य वाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

## २३ जानेवारी २०२४

**२३ जानेवारी २०२४** रोजी दुपारी ११ वाजता **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** अंतर्गत **व्याख्यानमाला या** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रो. पंकज गुंजाळ यांनी श्रोत्यांना संबोधित करून मराठी व्याख्यानमाला या स्पर्धेची सुरुवात केली ,व त्यांनी कार्यक्रमाची रुपरेषा आणि विविध स्पर्धांचे उद्दिष्ट सांगितले.

SSK COLLEGE OF PHARMACY
Wadzire, Tal: Sinnar, Dist : Nashik,
422102





## २४ जानेवारी २०२४

२४ जानेवारी २०२२ रोजी आभासी **"प्रश्न मंजुषा"** या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रश्न मंजुषा स्पर्धेचे सुत्रसंचलन प्रो. पंकज गुंजाळ यांनी केले. विजेत्यांच्या घोषणेने सत्राचा समारोप झाला.

कु. जयेश बागडे एका विद्यार्थीनीने प्रश्न मंजुषा स्पर्धेत प्रथम क्रमांक व कु. दिव्या कांगणे ह्या विद्यार्थीनीने "प्रश्न मंजुषा" स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. भाषेचे सामर्थ्य आणि त्याचा व्यक्तीच्या जीवनावर होणारा परिणाम या कार्यक्रमात अधोरेखित करण्यात आला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना भाषेच्या इतिहासाची जाणीव झाली आणि विद्यार्थ्यांना राजभाषा शिकण्यास प्रोत्साहन मिळाले. मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार या उ दिष्टांसह रोजगारभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरूण पिढीला आकर्षित करण्यासाठी खालील विषद्यावरील तसेच अशा स्वरुपाच्या अन्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** अंतर्गत राबविण्यात आलेल्या उपक्रम खालीलप्रमाणे :-

| |
|---|
| १. मराठी वाचन संस्कृती जपण्यासाठी मराठी साहित्य वाचण्यास प्रेरित करणे |
| २. विदयार्थ्यांना मराठी साहित्य पुस्तके विकत घेण्यासाठी व वाचण्यासाठी प्रोत्साहित करणे. |

३. महागड्या भेटवस्तू देण्याऐवजी मराठी साहित्या पुस्तके भेट देणे. त्यासाठी इत्यादी, उपक्रम. विद्यार्थाना मार्गदर्शन केले.

१. मराठी वाचन संस्कृती जपण्यासाठी मराठी साहित्य वाचण्यास प्रेरित कले :


मातृभाषेबद्दल असणारा आदरभाव व्यक्त करताना ज्ञानेश्वर म्हणतात, **"माझा मराठीचि बोलु कवतुके परी अमृतातेही पैजेसी जिंके ॥'** मराठी ही इंडो-युरोपीय भाषाकुलातील एक भाषा आहे. भारतातील प्रमुख २२ भाषांपैकी मराठी एक आहे. महाराष्ट्र आणि गोवा ह्या राज्यांची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही जगातील पंधरावी व भारतातील चौथी भाषा आहे. मराठी वाचन संस्कृती जपण्यासाठी सर्वांनी मराठीतील साहित्य स्वयंस्फूर्तीने वाचले.




२. विदयार्थ्यांना मराठी साहित्य पुस्तके विकत घेण्यासाठी व वाचण्यासाठी प्रोत्साहित करणे.

SSK COLLEGE OF PHARMACY
Wadzire, Tal: Sinnar, Dist : Nashik,
422102




३. महागड्या भेटवस्तू देण्याऐवजी मराठी साहित्या पुस्तके भेट देणे त्यासाठी इत्यादी, उपक्रम राबवून विद्यार्थांना मार्गदर्शन केले.





१४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा केला गेला कार्यक्रमाची सांगता करताना मराठी भाषेचे महत्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले ते खालीलप्रमाणे विजेत्यांच्या घोषणेने या सत्राचा समारोप झाला.

**जेथे पिकते तिथे विकत नाही'** असे म्हणतात. तसेच महाराष्ट्रात राहून `मराठी' भाषेचे महत्त्व तितके जाणवत नाही! आई समोर असताना आईचे महत्त्व जाणवते का? आपण जेव्ह परप्रांतात काही काळासाठी जातो व सतत जेव्हा ती परप्रांतीय अनोळखी भाषा कानावर पडू लागते. तेव्हा आपण आपली मातृभाषा ऐकण्यासाठी

कासावीस होतो. चुकून अपली भाषा बोलणारी , अनोळखी मंडळी दिसली तर ती माणसे अनोळखी असूनही खूप आपली वाटतात! हे भाषेचे अदृश्य धागे!

आपली मराठी भाषा समृद्ध व्हावी तिचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी आपण सर्वांनीची भूमिका फार महत्वाची आहे.आजची आपली तरुण पिढी, त्यांची 'सेलिब्रेट' करण्याची वृत्ती, त्यांचे माहिती-तंत्रज्ञानावरील प्रेम, करमणूकप्रधान समाजरचना, दिन-विशेष असे बिंदू लक्षात घेता हा कार्यक्रम सहज शक्य आहे असे मला वाटते. त्यात जेवढी कृतिशील भर घालता येईल तेवढे उत्तमच ! शेवटी एकच म्हणावेसे वाटते- **"वाढवू मराठी,गाजवू मराठी आणि बाळकडू म्हणून पाजवू मराठी!!"**

SSK College of Pharmacy, Sinnar, DTE Code 5502, MSBTE Code 62355, Wadzire

Prof.Dr.Sushil D.Patil
Principal
SSK College of Pharmacy
Wadzire,Sinnar,Dist.Nashik.

Wadzire, Tal: Sinnar, Dist : Nashik,
422102

Dhanlaxmi Shikshan Sanstha's

# SSK COLLEGE OF PHARMACY

SSK Campus, Wadzire, Tal: Sinnar, Dist: Nashik, Maharashtra 422102
(Approved by PCI, New Delhi, DTE Maharashtra, Affiliated by MSBTE)
PCI Code: 5808 DTE Code: 5502 MSBTE Code: 62355
Email: sskdpharmacy@gmail.com Website: www. sskdpharmacy.com

SSK COLLEGE OF PHARMACY
Wadzire, Tal: Sinnar, Dist : Nashik,
422102